कला अकादमी गोवा
कांपाल - पणजी
कअ/काविवि/को.नास्प/२०२०-२१/२८७२
दि.२६/०२/ २०२१

## कृपया प्रसिध्दीसाठी

कला अकादमीची ४७ वी कोंकणी नाट्यस्पर्धा दि. १ मार्च २०२१ पासून सुरू होत असून यंदाच्या स्पर्धेत एकूण २१ नाट्यसंस्था सहभागी झाल्या आहेत. ही स्पर्धा फोंडा येथील राजीव गांधी कला मंदिराच्या मा. दत्ताराम सभागृहात रोज सायं. ७.०० वाजल्यापासून दि. २६ मार्च २०२१ पर्यंत चालणार आहे. शासनाने घालून दिलेली कोविड-१९ ची सर्व मार्गदर्शक तत्वे पाळून या स्पर्धेचे आयोजन केले जाणार आहे. सदर स्पर्धेच्या आयोजनासाठी राजीव कला मंदिराचे सक्रिय सहकार्य लाभलेले आहे.

स्पर्धेच्या नियोजित कार्यक्रमानुसार दि. १ मार्च २०२१ रोजी अथश्री, फोंडा या संस्थेचे नारायण देसाय लिखित **क्वेशन मार्क** या नाटकाच्या सादरीकरणाने प्रारंभ होत आहे. नवदिशा, आंबेशी-पाळी या संस्थेच्यावतीने उल्हास यशवंत नाईक लिखित **त्या बंद फास्केंत** हे नाटक दि. २ मार्च रोजी होईल. तुळशीदास धोणशीकार यांनी लिहिलेले **आता तरी जागे जायात** हे नाटक दि. ३ मार्च रोजी गौरी तनय कला संघ, धोणशी-नागेशी ही संस्था सादर करेल तर इरफान मुजावर लिखित व श्याम प्रभू यांनी अनुवादित केलेले **आमोरी** हे नाटक दि. ४ मार्च रोजी श्री नागेश महालक्ष्मी प्रासादिक नाटयसमाज, बांदोडे-फोंडा या संस्थेतर्फे सादर केले जाईल. दि. ५ मार्च रोजी रसरंग, उगवे ही संस्था धर्मवीर भारती लिखित आणि रमेश वेळुस्कर अनुवादित **अन्धा युग** या नाटकाचा प्रयोग सादर करणार आहे.

दि. ६ मार्च रोजी सर्वेश एकनाथ नाईक यांनी लिहिलेल्या **इस्सक तेरा** या नाटकाचा प्रयोग देवताई कला क्रिएशन्स, मडकई-फोंडा ही संस्था सादर करेल.योगेश सोमण लिखित व आकांक्षा नाईक यांनी अनुवादित केलेले **द विंडो** हे नाटक दि. ८ मार्च रोजी १४३५ प्रॉडक्शन,म्हापसा या संस्थेतर्फे सादर केले जाईल. दि. ९ मार्च रोजी सावयवेरेंचो सख्याहरी, सावई-वेरे-फोंडा ही संस्था दिपराज सातोर्डेकर लिखित **बैल** हे नाटक सादर करणार आहे. दि. १० मार्च रोजी डॉ. तन्वी कामत बांबोळकार यांनी लिहिलेले **अनवाणी** या नाटकाचा प्रयोग अंत्रुज घुडयो, बांदोडे-फोंडा ही संस्था सादर करणार आहे तर दि. १२ मार्च रोजी आस्त क्रिएशन, पिळगांव या संस्थेचे गौतम अनंत गावडे यांनी लिहिलेले **इन सर्च ऑफ...** हे नाटक सादर होणार आहे. दि. १३ मार्च रोजी विनय दहिवाळ यांनी लिहिलेले व वसंत भगवंत सावंत यांनी अनुवादीत केलेले **वाय ऑफ व्हाय** हे नाटक सुयोग कला मंच, करमळी ही संस्था सादर करणार आहे.

दि. १५ मार्च रोजी सौ. आसावरी कुलकर्णी यांनी लिहिलेले **चौकोनी त्रिकोन** हे नाटक अपरांतमाची, पणजी ही संस्था सादर करणार आहे. दि. १६ मार्च रोजी पहाट, गावडोंगरी-काणकोण ही संस्था विठोबा सोनू वेळीप लिखित **नितीभंग** या नाटकाचा प्रयोग सादर करणार असून नटरंग क्रिएशन्स, नार्वे-डिचोली या संस्थेद्वारा पूंडलीक नायक लिखित **चतूरंगा** हे नाटक दि. १८ मार्च रोजी सादर करणार आहे. दि. १९ मार्च रोजी सातेरी युवा संघ, बिठ्ठोण या

संस्थेतर्फे इरफान मुजावर यांनी लिहिलेले व माधुरी शेटकर अनुवादीत केलेले **पूर्णविराम** हे नाटक सादर होणार आहे.

आर्या कौटिल्य,डोंगरी या संस्थेच्या वतीने कीर्ती श्याम नर्से लिखित **बट व्हाय?** हे नाटक दि. २० मार्च रोजी होईल. दि. २२ मार्च रोजी डॉ. पूर्णानंद च्यारी लिखित **अश्वत्थामा** हे नाटक भांगराळें गोंय-अस्मिताय, मडगाव ही संस्था सादर करणार आहे तर दि.२३ मार्च रोजी मदनंत सावई-वेरें या संस्थेतर्फे प्रशांत दळवी लिखित व वसंत सावंत यांनी अनुवादित केलेले **मनातल्या मनांन** हे नाटक सादर होणार आहे. दि. २४ मार्च रोजी रुद्रेश्वर, पणजी या संस्थेतर्फे विजय तेंडुलकर लिखित व कल्पना कुडतडकर वाळके यांनी अनुवादित केलेले **मित्राची काणी** हे नाटक सादर होणार आहे. दि. २५ मार्च रोजी श्री साई गणेश सांस्कृतिक मंडळ, म्हापसा ही संस्था प्रसाद कळंगुटकर लिखित **निमणी फेरी** हे नाटक सादर करणार आहे तर दि. २६ मार्च रोजी स्पर्धेचा समारोप श्री रवळनाथ प्रासादिक नाटय मंडळ, नागेशी-बांदोडा या संस्थेचे दत्ताराम कामत बांबोळकर लिखित **सत्य माड्डीता माड्डीता** नाटकाने होणार आहे.

स्पर्धेतील सर्व नाट्यप्रयोग रोज सायं. ७.०० वाजता राजीव गांधी कला मंदिर-फोंडा येथे होणार असून रु. ५०/- च्या प्रवेशिका नाट्यप्रयोगाच्या स्थळी तिकिट काऊंटरवर उपलब्ध असतील याची संबंधितानी नोंद घ्यावी असे कला अकादमीने कळविले आहे.

(डॉ. दत्तगुरु आमोणकर)
कार्यक्रम व विकास अधिकारी

प्रति
१.गोमंतक २.नवप्रभा ३.तरुण भारत ४.पुढारी ५.लोकमत ६.दै.हेराल्ड ७.गोवन वार्ता, ८. दै भांगरभूंय ९.आकाशवाणी पणजी केंद्र( वृत्तविभाग)

एसझेड/एसजी